**स. फौ. खटला क्र.३१५/२०२४**
**रायगड ग्रामीण पतसंस्था वि. सागर शर्मा**
(CNR No.MHRG090005362024)

**<u>निशाणी क्र.०१ वरील आदेश</u>**

१. तक्रार, तक्रारकर्त्याने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२५ खाली दाखल केलेले पडताळणीचे प्रतिज्ञापत्र, पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व तक्रारीसोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. तक्रारकर्त्याचे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

२. वर नमूद दस्तांचे काळजीपूर्वक वाचन केले असता आरोपीने दि. ०२/१२/२०२३ रोजीचे रक्कम रु.१,०२,७००/– चे बँक ऑफ इंडीया, शाखा नागोठणे येथील खाते क्र.१२५२१०११०००५२७८ धनादेश क्र.००००६५ तक्रारकर्त्याला कायदेशीर जबाबदारी फेडण्यासाठी दिल्याचे दिसून येते. सदरील धनादेश तक्रारकर्त्याने स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा नागोठणे येथील त्याचे खात्यात वटविण्यासाठी सादर केला असता तो दि.०४/१२/२०२३ रोजी न वटता सदर बँकेने 'Funds Insufficient' या शेऱ्यासह परत केल्याचे दिसून येते.

३. तक्रारकर्त्याने दि.२१.१२.२०२३ रोजी आरोपीला त्याचे पत्त्यावर पाठविलेली नोटीस दि.२६.१२.२०२३ रोजी आरोपीला मिळून देखील त्याने दि.२६.१२.२०२३ पासून १५ दिवसात फिर्यादीला धनादेशाची रक्कम दिली नाही. फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१९/२०२४ मधील न्यायनिर्णय दि.०९/०९/२०२४ अन्वये तक्रारकत्याकडून प्रस्तूतची तक्रार ठरलेल्या वेळेमध्ये दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात आल्याचे दिसून येते. नमूद परिस्थितीमध्ये, आरोपीने

प्रथमदर्शनी चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे दिसते. परिणामी, आरोपीविरूध्द आदेशिका जारी करण्यास पुरेसे कारण आहे अशी माझी खात्री झाली आहे. या कारणास्तव खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

(अ) आरोपीविरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२७ अन्वये चलनक्षम दस्तऐवज अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दंडनीय अपराधासाठी आदेशिका जारी करण्यात येते.

(ब) आरोपीला समन्स काढावे.

(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने दामोदर एस. प्रभु वि. सय्यद बाबालाल २०१० ए.आय.आर. (एस.सी.) १९०७ मध्ये दिलेले निर्देश नोंद करावेत.

(ड) आरोपीने प्रकरणात हजर झाल्यानंतर पहिल्या अथवा दुसऱ्या तारखेला अपराध तडजोडीने मिटवण्यास अर्ज केल्यास व त्याप्रमाणे तडजोड मान्य होताना आरोपीवर कोणताही खर्च लादला जाणार नाही.

(इ) आरोपीने प्रकरणात दुसऱ्या तारखेनंतर पुढे कोणत्याही टप्प्यावर अपराध तडजोडीने मान्य केला तर फिर्यादीत नमूद धनादेशाच्या १० टक्के रक्कम मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांच्याकडे जमा करण्यासाठी या न्यायालयात भरण्याची अट लादण्यात येईल व अपराध तडजोडीने या अटींची पुर्तता केल्यानंतरच मिटेल.

(फ) आरोपीला पुढे असेही सुचित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने नमुद प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार मा. उच्च न्यायालय अथवा मा. सत्र न्यायालयात अपील अथवा रिव्हीजन दाखल झाल्यानंतर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या १५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(ग) आरोपीने मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल अथवा रिव्हीजन दाखल झाल्यावर तडजोड करायची असल्यास फिर्यादीत नमुद धनादेशाच्या २० टक्के रक्कम भरावी लागेल.

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.12.27 15:05:56 +0530

दि. २७.१२.२०२४

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.